आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत नागरी आदिवासी वस्ती सुधारणा योजनेसाठी सन २०१८-१९ करीता निधी वितरीत करण्याबाबत.
लेखाशिर्ष (२२१७ १२५९)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८/ प्र.क्र.०७ /कार्यासन-६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख:- ८ मार्च, २०१९.

<u>वाचा -</u>

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. २.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.आवसु १००६/प्र.क्र.८०/नवि-४,दि.६.०२.२००७
३) नगर विकास विभागाची नस्ती क्र. एव्हीवाय- २०१८ / प्र.क्र. १३२ / नवि- ०४.

<u>शासन निर्णय</u> :-

मागणी क्र. टी-५, २२१७- नगर विकास , जनजाती क्षेत्र उपयोजना, ८०- सर्वसाधारण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०२) शहरी भागाची आदिवासी वस्ती सुधारणा, लेखाशिर्ष (२२१७ १२५९), ३१-सहायक अनुदाने या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता मध्ये रु. ६००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर अर्थसंकल्पित रकमेपैकी नगर विकास विभागाने संदर्भाधीन क्र.३ येथील नस्तीन्वये प्रस्तावित केल्यानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नंदूरबार नगरपरिषद -२७०.०० लक्ष, व किनवट नगरपरिषद -१५०.०० लक्ष असे एकूण रु.४२०.०० लक्ष (अक्षरी रुपये चार कोटी, वीस लक्ष फक्त) इतका निधी प्रशासकिय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांना अर्थसंकल्पिय निधी वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता विभाग प्रमुख व संबधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर तरतुद खर्च करतांना शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.टिएसपी-२००३/प्र.क्र.१०१/का-६, दिनांक २६ जुलै, २००४ व टिएसपी-२००५/प्र.क्र.५९/का-६, दिनांक १० नोव्हेंबर, २००५ मधील अटींचे कटाक्षाने पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार सदर निधी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व नगर विकास विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्येच कामे हाती घेण्याबाबत दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०५१७२६४२५६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.11 15:14:11 +05'30'

रविंद्र दि. औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई .
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास.
४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदूरबार /नांदेड.
५. जिल्हाधिकारी, नंदूरबार व नांदेड
६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०. वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
११. नगर विकास विभाग, नवि-४, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१२. कार्यासन अधिकारी, कार्यासन- १७, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.